संफौ.खटला क्र. २८०/२०१८
सरकार वि. शेख करीम
नि.क्र. ९ खाली

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ ची साक्ष शपथेवर सुरु :–**

नाव : सुधीर शामराव चौधरी,
वय : ४२ वर्षे, कामधंदा : शेती,
राहणार : परसोडा, ता. रामटेक, जिल्हा नागपूर

**शपथेवर सरतपास सुरु** :–
**सरतपास श्री. एम.आर. भांडेकर सहाय्यक सरकारी वकील यांच्यामार्फत** :–

मी साक्षीदार राजू करवे यांना ओळखतो. दिनांक १०/०१/२०१८ रोजी पोलीसांनी मला व दुसरा पंच राजू करवे याला रामटेक येथील किट्स कॉलेज जवळील रोडवर बोलवले होते. पोलीसांनी त्याठिकाणी नाकाबंदी केली होती. पोलीसांनी एक १० चक्का ट्रक अडविला होता. ड्रायव्हर व गाडीतील इतर लोक पळून गेले होते. पोलीसांनी माझ्यासमक्ष त्याठिकाणी गाडीचा पल्ला उघडून पाहणी केली असता त्या गाडीमध्ये २६ गायी व ६ बैल होते. सदरची जनावरे गाडीमध्ये ठासून भरून बांधलेले होते. पोलीसांनी त्याठिकाणी पंचनामा करून आमची सही घेतली. आता मला समन्स व घटनास्थळ वजा जप्तीपंचनामा दाखवला. त्यावर माझी अनुक्रमांक १ वर सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी क्र. १७ व १८** देण्यात येतो.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपींचे विधीज्ञ श्री. ए.जी. कारेमोर यांच्यामार्फत** :–

३} पोलीसांनी मला पंचनामा करायचा आहे, म्हणून लेखी पत्र दिले नव्हते. मी दिवसभर शेतीची कामे करतो. साक्षीदार स्वतः सांगतो की, माझ्याकडे गाई व जनावरे

आहेत. मी सदरची जनावरे चारण्याकरीता शेतात घेऊन जातो. माझ्या घरापासून किट्स कॉलेज साधारण १ किमी. असेल. हे म्हणणे खरे नाही की, दि. १०/०१/२०१८ रोजी पोलीसांनी मला किट्स कॉलेज रोडवर पंचनामा करण्यासाठी बोलवले होते, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी पोलीसांनी नाकाबंदी केली होती व एक १० चक्का ट्रक अडविला होता व त्या ट्रकमधील ड्रायव्हर व इतर लोक पळून गेले होते, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी त्याठिकाणी आमच्यासमक्ष गाडीचा पल्ला उघडून पाहणी केली असता त्यामध्ये २६ गायी व ६ बैल ठासून बांधलेले होते, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझी समन्स वरील व घटनास्थळ जप्ती पंचनाम्यावरील सही एकाच वेळी पो. स्टेशनमध्ये घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत — माझे समक्ष,

रामटेक. — (एच.एस.सातपुते)

दिनांक : १५/०१/२०२५. — न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, रामटेक.